# महाराष्ट्र शासन
## ग्रामविकास व जलसंधारण विभाग
## ग्रामपंचायत आरळा ता.शिराळा जि.सांगली
## ई-निविदा सूचना २०२६-२०२७ (NIT) क्रमांक ०१
### टेंडर आय डी २०२६_SANGL_

सांगली जिल्हा परिषद सांगली कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने खालील कामाच्या ई-निविदा मागवीत आहे. ई-निविदा http://www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर भरता येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये Portion Cost) | जी एस टी | इन्शुरन्स + SQM | एकूण | बयाणा रक्कम रुपये | कोऱ्या निविदा संचाची किंमत रुक्कम रुपये | काम पूर्ण करणेची मुदत | अधिकृत ठेकदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती ग्राम पंचायत इमारत बांधणे योजना** | | | | | | | | | |
| **१** | **मौजे आरळा ता. शिराळा येथे नविन ग्राम पंचायत इमारत बांधकाम करणे.** | २१०५२१८ | ३७८९३९ | १०५२६ + ५२६३ | २४९९९४६ | २१०५२ | १००० | १२ महिने | **मजूर सहकारी संस्था वर्ग अ** |

१) उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केलेला असून निविदा संच "http://www.mahatenders.gov.in" या संकेतस्थळावर दिनांक ०७/०५/२०२६ रोजी स. १०.०० वाजले पासून ते दिनांक २१/०५/२०२६ रोजी सां. १८.०० वाजेपर्यंत ई-निविदा पद्धतीने ऑनलाईन डाऊनलोड व उपलोड करता येईल करता येईल.

२) उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किमंत ही ऑनलाईन पद्धतीने नेट बँकिंगद्वारे वेबसाईट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्णतः यशस्वी झालेली पेमेंट स्लीप स्कॅन करून तांत्रिक लखोट्यात अपलोड करण्यात यावी.

३) निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे. डांबरीकरण करावयाच्या कामासाठी वापरण्यात येणारे डांबर शासनाच्या अंगीकृत असलेल्या तेल रिफायनरीमधूनच खरेदी करुन घ्यावे व खरेदी केलेल्या डांबराची मूळ चलने देयकासोबत जोडणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. डांबरीकरणाच्या कामांमध्ये कामांवर वापरावयाच्या डांबराचे तेल कंपन्याकडील मूळ चलन कंपनीकडे खातरजमा करणेसाठी पाठविण्यात येईल त्याची खातरजमे नंतरच कामांवर वापरण्यास परवानगी देण्यात येईल. खातरजमा न केलेले डांबर कामांवर वापरलेले आढळल्यास त्या कामाचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४) सदर निविदे मधील **प्लॅंन्ट** अशी नमूद केलेली कामे ही डांबरीकरणाचीआहेत.तरी हॉटमिक्स प्लॅंन्टसाठी लागणारी सर्व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

५) सन २०१७-१८ च्या दरसुचीन्व्ये यांत्रिकी पद्धतीने बनविलेली खडी या साहित्यावर रॉयल्टी (स्वामित्वधन) आकारण्यात येणार नाही. तथापि दर पृथकरणामध्ये ती दिली गेली असल्यास ती वजा करूनच (घटीत दराने) देयक अदा केले जाईल.

**६) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.ग्रासयो-2020/प्र.क्र.70/बांधकाम 2 दिनांक 05 एप्रिल 2023 मधील क्रं.4.2 अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी र.रु. 15/-लक्ष अंदाजपत्रकीय किंमतीच्या आतिल काम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर सदर अभियंता र.रु.50/- लक्ष किमती पर्यतच काम करण्यास पात्र असेल. त्यासाठी सु.बे.अ. यांनी वर्ग 5 चे नोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. तसेच यासाठी सदर अभियंत्याने र.रु.15/- लक्ष ते 50/- लक्ष पर्यतेचे काम भरतेवेळी कार्यकारी अभियंता (इवद) जि.प. सांगली यांचे र.रु. 15/- लक्ष पर्यत काम यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे काम पूर्णत्वाचा दाखला सोबत जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर बाबीची पूर्तता केली नसल्यास त्याना निविदा प्रक्रिया मधून अपात्र करण्यात येईल.**

७) सन सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२०२५ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मदुतीत दिनांक ३१/०३/२०२५ अखेर भौतिकदृष्टया पूर्ण नसल्यास (योग्य कारणाशिवाय पूर्ण नसल्यास) सदर मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल. (उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं.०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.)

८) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना जि.प.कडील नोंदणी प्रमाणपत्र ज्या नावाने दिलेले आहे त्या नावानेच निविदा भरणे अनिवार्य आहे. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी फर्म /बिल्डर्स या नावाने निविदा भरलेल्या आढळलेस अपात्र करणेत येईल.

९) तांत्रिक मंजुरी मधील सर्व अटी व शर्ती मक्तेदारास बंधनकारक असतील.

१०) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नियम पुस्तिका मधील परिशिष्ट १४ (५) अन्वये तांत्रिक मनुष्यबळ असलेबाबतचा पुरावा अपलोड करणे अनिवार्य आहे. (मजूर सहकारी सोसायटी साठी अनिवार्य)

| | |
|---|---|
| **सही/-xxx** | **सही/-xxx** |
| **सचिव तथा ग्रामपंचायत अधिकारी**<br>**ग्रामपंचायत आरळा**<br>**ता. शिराळा जि. सांगली** | **सरपंच**<br>**ग्रामपंचायत आरळा**<br>**ता. शिराळा जि. सांगली** |

# प्रमाणपत्र

(सदर प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्र.०१ मध्ये मक्तेदारांच्या/सोसायटीच्या स्वत:च्या लेटरपॅड वर अपलोड करणे आवश्यक आहे)

सदर निविदा सूचनामधील काम क्रं.------- हे मी भरलेले असून, यापूर्वी सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२०२५ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत भौतिक किंवा आर्थिकदृष्टया पूर्ण केलेली आहेत.

सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२०२५ मधील काम माझेकडून दिनांक ३१/०३/२०२५ अखेर अपूर्ण असल्यास----------- ------------------------------------------(समर्पक कारणासह योग्य त्या कागदपत्रासह स्पष्टता करावी)

वर नमूद केलेली माहिती जर का चुकीची अथवा अपूर्ण कामाबाबत कारण समर्थनिय नसल्यास सदर निविदेमधून अपात्र करण्यात येईल याची मला माहिती आहे. (उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं. ०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.)

सही/-xxx
मक्तेदाराचे संपूर्ण नांव :-
पूर्ण पत्ता :-
भ्रमणध्वनी क्रमांक :-

## नमुना करारपत्र / सत्यप्रतिज्ञा पत्र (र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)
## (Notarized / Affidavit)

मी ---------------------- वयवर्ष/ ------- राहणार, --------------------- या सत्य प्रतिज्ञा लेखेद्वारे लिहून देतो की, मी ------------ या फर्मचा कंपनीचा प्रोप्रायटर असून मालक असून/ई निविदा क्र --------- मधील क्र -- चे कामाचे नाव ----------------------- या कामासाठी निविदा सादर केली आहे. या निविदेच्या लिफाफा क्र १ मध्ये मी सादर, केलेली सर्व कागदपत्रे खरी .बरोबर व पूर्ण आहेत,त्यामध्ये कोणत्याही त्रुटी चुका नाहीत,याची मी खात्री केलेली आहे ,असे शपथ पूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या करारामध्ये निविदेसंदर्भात सादर केलेल्या/ कागदपत्रामध्ये काही चुकीची खोटी तसेच अपूर्ण माहिती, दिशाभूल करणारी ,आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी माझ्या कार्यालयाने किंवा कर्मचाऱ्यानी कार्यालयास कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली / असल्यासमी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
२. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले , , बनावट किंवा फसवी आढळल्यास/कोणतेही खोटी मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळीकोणतेही माहिती , ,फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास ,बनावट/किंवा कागदपत्रे खोटी मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन आणि माझी सांगली जिल्हा परिषदेकडे झालेली नोंदणी कायमची रद्द करण्यात येवून मला काळ्या यादीत टाकणेत येईल याची मला कल्पना आहे.

कंत्राटदाराची सही / शिक्का

# <u>स्वयं घोषणापत्र</u>

**<u>(सदर प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्र.०१ मध्ये मक्तेदारांच्या/सोसायटीच्या स्वत:च्या लेटरपॅड वर अपलोड करणे आवश्यक आहे)</u>**

मी-----------------------------------वय वर्षे ----------------------राहणार या घोषणापत्राद्वारे लिहून देतो की, मी---------------------मजूर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंता /चेअरमन/सचिव/फर्मचा/ कंपनीचा मालक असून नोटीस क्र ---------------------मधील काम क्र कामाचे नाव ------------------------------या कामासाठी निविदा सादर करीत आहे.सदर कामासाठी भरलेली माझी निविदा स्वीकृत झाल्यास सदर कामासाठी आवश्यकअसणारी सर्व यंत्र सामुग्री भाडे कराराने अथवा खरेदीने उपलब्ध करून सदरचे काम गुणवत्तेने व निविदेमधील कालमर्यादेत पूर्ण करणेची हमी मी या स्वयं घोषणापत्राद्वारे देत आहे.

सदरचे काम मी गुणवत्तेने व निविदेमधील कालमर्यादेत पूर्ण केले नाही तर निविदेतील अटी व शर्तीनुसार शासकीय कारवाईस पात्र राहीन. तसेच तर निविदेतील अटी व शर्तीचा आणि स्वयं घोषणापत्राचा भंग झाल्यास माझी नोंदणी निलंबित अथवा रद्द होवू शकते याची मला जाणीव आहे.

माझा आधार क्र -------------------------------हा आहे.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

# महाराष्ट्र शासन
# ग्राम  विकास व जलसंधारण विभाग
# ग्रामपंचायत आरळा ता.शिराळा जि.सांगली
# ई-निविदा सूचना २०२६-२०२७ (NIT) क्रमांक ०१
### टेंडर आय डी २०२६_SANGL_

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सूचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) वरील कामाचे निविदा प्रपत्रे http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ दिनांक ०७/०५/२०२६ रोजी स. १०.०० वाजले पासून ते दिनांक २१/०५/२०२६ रोजी सां. १८.०० वाजेपर्यंत डाऊनलोड करता येतील.

३) वरील कामाच्या निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०७/०५/२०२६ रोजी स. १०.०० वाजले पासून ते दिनांक २१/०५/२०२६ रोजी सां. १८.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर (अपलोड) करता येतील.

४) उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पध्दतीने नेट बँकिंगव्दारे वेबसाईट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्णत: यशस्वी झालेली पेमेंट स्लीप तांत्रिक लखोटयात अपलोड करण्यात यावी.

५) संबंधित कंत्राटदाराने वरीलप्रमाणे तांत्रिक लिफाफा सोबत विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अपलोड केल्यानंतर सदरील प्रमाणपत्राची मूळ प्रत कार्यालयास जमा करण्याची आवश्यकता असणार नाही.

६) कंत्राटदारांनी निविदा खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने (Two Envelope) निविदा सादर करणे आवश्यक आहे

### अ)फी / पात्रता / तांत्रिक (लिफाफा क्रमांक ०१)

१) निविदा डाऊनलोड (Download) करणेसाठी निविदा फी व बयाणा रक्कम नेट बँकिंग व्दारे भरणा केलेली ऑनलाईन प्रत.

२) **निविदा संच फी व १% इसारा (बयाणा) रक्कम लागू असल्यास ही सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी स्वत: च्या बँक खातेमधून व खुला मक्तेदारांने प्रोप्रा. असल्यास स्वत:च्या व फर्म असल्यास फर्मच्या बँक खात्यातून ऑनलाईन नेट बॅकींग व्दारे भरणा करणे बंधनकारक आहे व ती भरणा केल्याचे बँक स्टेंटमेंट (बँकेचा खाते उतारा) स्कॅन करुन लिफाफा नं.०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे. सदर बाबीचे ज्या स्तरावर उल्लघन झाल्याचे निदर्शनास येईल त्या स्तरावर संबंधितांस विनाकारण बजावता अपात्र करणेत येईल.**

३) जि.प.सांगलीकडे नोंदणी केलेल्या वैध नोंदणी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत.

४) **र.रु. ३.०० लक्ष चे आतील स्थानिक व र.रु. ३ लक्ष वरील किंमतीच्या ई-निविदा सोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबत प्रतिज्ञापत्र ५००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर (करारपत्र/सत्यप्रतिज्ञा पत्र )करून लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक असून निविदेसोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच एका निविदा नोटीस मधील एक अथवा जादाकामासाठी एकच करारपत्र /सत्यप्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे. (नोटरी किंवा प्रतिज्ञापत्र करणे बंधनकारक )**

५) **निविदा स्वीकृती पूर्वी निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रात ,कार्यारंभ आदेश स्तरावर व ते निर्गमित केल्यानंतर अथवा निविदा कालावधी दोषदायित्व कालावधीव पत्र व्यवहार यात व देयक अदा करताना कोणतेही कागदपत्रे खोटी आढळून आल्यास कंत्राटदार पूर्णपणेजबाबदार राहतील, निविदा छाननीकरणारे अधिकारी / कर्मचारी जबाबदारअसणार नाहीत. त्यामुळे भा.द.वी.सं.अंतर्गत कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.**

६) सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२०२५ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मदुतीत दिनांक ३१/०३/२०२५ अखेर भौतिकदृष्ट्या पूर्ण नसल्यास (योग्य कारणाशिवाय पूर्ण नसल्यास) सदर मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल. (उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं. ०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.)

७) महाराष्ट्र शासन , सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र०८/इमा-२/दिनांक २७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्र. ५.५ नुसार निविदे मध्ये देणेत आलेले स्वयंघोषणापत्र स्वत:च्या लेटर पॅडवर/ सध्या कागदावर स्वसाक्षांकीत केलेली पत्र अपलोड करणे अनिवार्य आहे.

८) A.Y.-२०२३-२४ चे प्राप्तीकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र (सुबेअ व मजूर सहकारी सोसायटी यांच्यासाठी प्राप्तीकर नसल्यास पॅनकार्डची स्कॅन केलेली प्रत).

९) भागीदारी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत अथवा नोटरी केलेले भागीदारी करारपत्र (भागीदारी असल्यास)

१०) मक्तेदारांस देयके अदा करतांना GSTN असल्याशिवाय देयके अदा करता येणार नसल्याने निविदा भरणा-या सर्व मक्तेदाराकडे GSTN असणे आवश्यक आहे. निविदा भरण्याच्या दिनांकापूर्वी संबंधित विभागाकडे GSTN साठी साठी मागणी केली असल्यास संबंधित विभागाची पोहोच दर्शविणा-या पत्राची प्रत निविदेबरोबर जोडली (अपलोड) असल्यास सदर मक्तेदारांना पात्र केले जाईल. परंतु प्रथम देयकांवेळी किंवा पहिले व अंतिम देयकावेळी GSTN नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध देयक अदा केले जाणार नाही. म्हणजेच GSTN असणा-या किंवा मागणी केलेल्या मक्तेदारांनाच पात्र करण्यात येईल.

११) **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद सांगली यांचे कडील पत्र जा.क्र अति-मुकाअ/पी.ए/५६१/२०२० दिनांक २८/१२/२०२० व मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद सांगली यांचे कडील पत्र जा.क्र अति-मुकाअ/पी.ए/५७८/२०२१ दिनांक ०९/०२/२०२१ नुसार मजूर सहकारी संस्थाकडील सर्व मजुरांची नोंदवहीची प्रत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे सही व शिक्काने ( Self Attested ) अपलोड करणे अनिवार्य आहे.**

१२) **सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नियम पुस्तिका मधील परिशिष्ट १४ (५) अन्वये तांत्रिक मनुष्यबळ असलेबाबतचा पुरावा अपलोड करणे अनिवार्य आहे. (मजूर सहकारी सोसायटी साठी अनिवार्य)**

१३) **मजूर सहकारी संस्था यांनी मजुरांच्या खात्यामध्ये परिश्रमिक मूल्य/रोजंदारीची रक्कम जमा करणे आवश्यक आहे.**

१४) **मजूर सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अंतर्गत सर्व नियम व अटी यांचे पालन करणे आवश्यक आहे.**

१५) **महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं. सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/इमा २ दिनांक ११/०५/२०२२ व १२/०५/२०२२ रोजीचा शासन निर्णयान्वये**

१) शासन निर्णय दि. २७/०९/२०१८ अन्वये परिच्छेद ५.५ मधील तरतूदीनुसार रु१५० कोटी रक्कमेच्या कामांसाठी तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या कामांसाठी Hot Mix Plant/Batch Mix Plant/ Machinery यांच्या मालकीबाबतची अट निविदेमध्ये समाविष्ठ न करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि आता रु.५० लक्षपर्यंतच्या रस्ते डांबरीकरण, पूल व इमारती कामांसाठी स्व:मालकीची अट निविदेमध्ये घालण्यात येवू नये.

२) शासन निर्णय दि. २७/९/२०१८ अन्वये परिच्छेद क्र.२.९ मधील तरतुदीनुसार कंत्राटदाराची कमाल उलाढाल मागील ५ वर्षासाठी नमूद केली आहे. तथापि कोविड महामारीमुळे उद्भवलेली विशिष्ट परिस्थिती विचारात घेवून कंत्राटदाराची उलाढाल मागील ५ वर्षाऐवजी ७ वर्षे विचारात घेण्यात यावी. तसेच शासन निणर्य दि. २७/९/२०१८ मधील परिच्छेद २.९ मध्ये नमूद कंत्राटदाराने केलेले तुल्यबळ किंमतीचे काम, देय कामाचे महत्त्वाचे परिणाम व Bid Capacity यासाठी ५ वर्षाऐवजी ७ वर्षे कालावधी विचारात घेण्यात यावा. सदर सवलत केवळ मार्च २०२३ अखेर लागू राहील.

३) शासन परिपत्रक दि. १७/९/२०१९ अन्वये रु ३ लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच Bid Capacity परिगणित करतांना ((अXएनX२) बी) ऐवजी ((अXएनx१.५)-बी) प्रमाणे परिगणना करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. कोविड महामारीमुळे उद्भवलेली विशिष्ट परिस्थिती विचारात घेवून Bid Capacity परिगणित करतांना पुनश्च: {(अ) XएनX२) - बी) याप्रमाणे Bid Capacity परिगणित करण्यात येईल

४) शासन परिपत्रक दि. १७/९/२०१९ अन्वये रु. ३ लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि आता रु ५० लक्ष किंमतीच्या वरील सर्व कामांसा Bid Capacity ची अट लागू करावी. तथापि एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त काम घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्त लागू राहील याबाब खातरजमा करण्यासाठी लिफाफा क्र.१ मध्ये चालू वित्तीय वर्षात हाती घेतलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहित सादर करणे कंत्राटदारास अनिवार्य आहे.

~~१६) जागेची पडताळणी केले असले बाबतचा ग्रा.प.दाखला~~

१७) **अनावश्यक व कालबाह्य झालेली कागदपत्रे सादर केलेस संबंधित मक्तेदारास विना नोटीस अपात्र करणेत येईल.**

## ब) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्रमांक ०२)

१) कंत्राटदारांनी आपले दर विहित "BOQ" मध्ये योग्य त्या जागी करुन सदरची "BOQ" लिफाफा क्रमांक ०२ मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करणेत येऊ नयेत.

२) **स्थायी समिती जि.प.सांगली कडील सभा दि.०२/११/२०१८ ठराव क्रं.२३१ अन्वये मक्ता मंजूरीनंतर १५ दिवसांत स्टॅम्प पेपर देवून व अनामत रक्कम भरुन कार्यारंभ आदेश घेणे बंधनकारक आहे. तसे न केलेस एल-१ (निम्नस्तर) असून सुध्दा त्या मक्तेदारास त्या निविदेस हक्क राहणार नाही. सदर मक्तेदाराची ईएमडी जप्त करुन त्याच मक्तेदारास वेळेचा अपव्यय करणे म्हणून नोंदणी तीन महिन्यासाठी निलंबित केले जाईल. तद्रंतर सदरचे काम तात्काळ व्दित्तीय (निम्नस्तर) मक्तेदार एल २ ला जर एल १ च्या दराने करणेस तयार असेल तर तात्काळ स्टॅम्प पेपर व अनामत रक्कम भरणेस तयार असेल तर त्यास देणेत येईल. अन्यथा सदर कामाची नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येईल.**

३) **मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.विकास/कार्यासन-५/कावि-११३९/२०१८ दिनांक ०५/०९/२०१८ अन्वये मक्तेदारांनी जर का मुदतीत काम पूर्ण न केल्यास सदर परित्रकात नमूद केलेप्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल. (सोबत सदर परिपत्रकाची प्रत अपलोड केलेली आहे)**

४) शासन निर्णय क्रं.सीएटी/२०१७/प्र.क्रं.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २६/११/२०१८ अन्वये अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना रद्द करण्यात येत असून लिफाफा क्र ०१ व लिफाफा क्र ०२ उघडल्यानंतर प्रथम निम्नतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने (Additional Performance Security Deposit) आठ दिवसाच्या आत सरपंच / सचिव तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत आरळा, ता. शिराळा, जि. सांगली कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. ही ८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम असणार नाही, त्यामुळे अशा प्रकरणी कार्योत्तर मंजुरीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे व वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येवू नयेत.प्रथम न्यूनत्तम देकाराच्या (L१)निविदाकाराने वरील विहित मुदतीत (Additional Performance Security Deposit) चा भरणा केला नाही दित्तीय न्यमत्तम (L२) निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व (L२) निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व (L२) निविदाकार (L१)पेक्षा कमी दराने कामकरण्यास तयार असतील त्याची निविदा मंजूर करण्यात येईल.

**अ**) देकार १०% कमी दारापर्यंत असल्यास १% व

**ब)** देकार १५% कमी दारापर्यंत असल्यास -१०% कमी दारापर्यंतचा १% व (१५%-१०%)=५% =असे एकूण (१+५)=६%

**क)** देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पट्टीने रक्कम डी.डी. द्वारे सादर अनिवार्य राहील. उदा. १९% कमी दाराकरिता खालीलप्रमाणे पृथ:करण :- १०% कमी दारापर्यंत १% व १५% कमी दारापर्यंत (१५%-१०%)=५% तसेच (१९%-१५%)=४% करिता (४ X २)= ८% असे एकूण (१+५+८)=१४%

**बाब क्रं.**४.६.५ **अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना आहेत.**

(अ) डी.डी. सरपंच, ग्रामपंचायत आरळा यांच्या नांवे असावा.

(ब) डी.डी.सरकारी/शेडयुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकेचा असावा.

(ड) लिफाफा क्र ०१ व लिफाफा क्र ०२ उघडल्यानंतर प्रथम निम्नतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने (Additional Performance Security Deposit) आठ दिवसाच्या आत सरपंच / सचिव तथा ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत आरळा, ता. शिराळा, जि. सांगली कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. ही ८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम असणार नाही

(छ) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / बॅंक प्रतिभूती हमी सादर करण्या-या कंत्राटदाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी व संबंधित कंत्राटदारांना काळया यादीत टाकणेत येईल. तसेच अशा काळया यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडणेत येणार नाहीत.

**उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रं.**५.५ **यंत्रसामुग्री बाबत खालीलप्रमाणे**

१) यंत्रसामुग्रीसाठी स्वत:च्या मालकीच्या जागेची अट टाकण्यात येऊ नये.

२) कामांसाठी नवीन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत धरण्यात यावे.

३) पहिल्या १० वर्षाकरीता अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

४) १० वर्षानंतर प्रतिवर्षी अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे योग्यता प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५) र.रु.१.५० कोटी रक्कमेच्या कामांसाठी तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या कामांसाठी Hot Mix Plant/ Batch Mix Plant/ Machinery यांच्या मालकी हक्काबाबतची अट निविदेमध्ये समाविष्ट करण्यात येवू नये. यासाठी स्वसांक्षाकित भाडे प्रमाणपत्राची अट टाकण्यात येत आहे.

६) निम्नतम निविदाधारकांकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

## क)निविदा सादर करणे.

१) उपरोक्तप्रमाणे नमूद दोन लिफाफा पद्धतीने निविदा ऑनलाइन पद्धतीने अपलोड करून सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील. कंत्राटदरांनी विहित वेळेपूर्वी त्यांची निविदा अपलोड करणेची दक्षता घ्यावी.

२) कंत्राटदरांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय Specification कामाचे स्थळ मंजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करून निविदा सादर कराव्यात.

३) ऑनलाइन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्रं.०१ (तांत्रिक लिफाफा) दिनांक २३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून http://www.mahatenders.gov.in यासंकेतस्थळावर ग्रामपंचायत कार्यालय आरळा येथे उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास)

४) लिफाफा क्रं.०१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करून सदरचे छाननीमध्ये पात्र ठरलेल्या कंत्राटदारांचा दाराच्या लिफाफा क्रं.०२ उघडण्यात येईल.

५) कंत्राटदरांनी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्रं.०२ उघडल्यानंतर ९० दिवसा पर्यंत वैध राहतील.

६) मंजूर निविदाधारकाकडून कामाच्या करारनामा करतेवेळी ओपन मक्तेदार वर्ग साठी निविदा रक्कमेच्या १.५% इतकी रक्कम सुरक्षा ठेव व सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि मजूर सहकारी सोसायटी कंत्राटदार वर्गासाठी निविदा रक्कमेच्या २.५% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेतली जाईल व उर्वीरत २.५% अनामत रक्कम प्रथम धावते देयकातून कपात केली जाईल.

७) यशस्वी कंत्राटदराने सुरक्षा अनामत रक्कम ७ (सात) दिवसात भरून विहीत नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील. कंत्राटदाराने विहित वेळेत करारनामा करून न दिल्यास सदरचे कंत्राटदाराचे बयाणा रक्कम जप्त करून कंत्राटदारास काळ्या यादीत टाकाणेत येईल.

८) निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुद्धीपत्रके अथवा इतर सर्व माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. ती वेळोवेळी तपासणे व भरलेल्या निविदेमध्ये योग्य ते बदल करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे.

९) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं.पसस/१००१/प्र.क्र.४०/जल ३/दिनांक १९/१०/२००१ अन्वये मक्तेदाराकडून वसूल केलेली ५% इतकी अनामत रक्कम Defect Liability period साठी राखून ठेवणेत येईल.

१०) निविदेतील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराची निविदा वा अर्थवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.

११) कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा स्विकारल्या तरी मंजूर केल्या जाणार नाही.

१२) निविदेबाबत शुद्धीपत्रक काढणेची गरज भासल्यास ते http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

१३) ई-निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे. तसेच एखाद्या कामाची निकट लक्ष्यात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथील करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

१४) संक्षिप्त निविदा सूचना व सविस्तर सूचना निविदा संचाचा एक भाग राहिल.

१५) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

१६) अन्य जि.प.कडील नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजूर सहकारी सोसायटी यांना जि.प.सांगली अंतर्गत प्रसिद्ध केलेल्या निविदेमध्ये सहभाग घेता येणार नाही

१७) निम्नस्तर (L१) निविदाधारकाने काम करण्यास नकास दिल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. एखादा मक्तेदार निम्नस्तर निविदा भरून जर काम करणेस किंवा सुरक्षा ठेव भरणेस नकार देत असलेचे निदर्शनास आलेस, त्यांचेवर निविदा भरणेस प्रतिबंधाची कार्यवाही करणेत येईल. निम्नस्तर (L१) निविदा धारक काम करणेस तयार नसेल तर द्वितीय निम्नस्तर (L२) निविदा धारकास प्रथम निम्नस्तर (L१) दराने काम करणेस तयार असलेची विचारणा करून तयार असल्यास त्याला टी निविदा बहाल केली जाईल.

१८) मक्तेदाराने मक्ता मंजूर व कार्यारंभ आदेश दिलेनंतर पंधरा दिवसामध्ये काम सुरु करणे बंधनकारक राहील. तर पुढील पंधरा दिवसामध्ये कामाचा प्रगती अहवाल व छायाचित्र सादर करावे.उपरोक्त कालावधीत जर काम सुरु झाले नाही तर मक्तेदाराने विलंबाबाबत योग्य खुलासा सादर करणे बंधनकारक राहील. खुलासा योग्य अथवा समाधानकारक नसलेस मक्तेदाराचा कार्यारंभ आदेश विना नोटीस रद्द केला जाईल तसेच अनामत रक्कम जप्त करून कंत्राटदारास काळ्या यादीत टाकाणेत येईल.

१९) Contractor Shall submit a certificate to the effect that “All the Payments to the Labor/Staff are made in bank accounts of staff Linked to Unique Identification Number (AADHAR CARD)” The Certificate shall be submitted by the contractor within the 60days from the commencement of contract. If the time period of contract is less than 60 days then such certificate shall be submitted within 15 days from the date of commencement of contract.

**सही/-xxx**

**सचिव तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत आरळा**
**ता. शिराळा जि. सांगली**

**सही/-xxx**

**सरपंच**
**ग्रामपंचायत आरळा**
**ता. शिराळा जि. सांगली**

Signature Not Verified

Digitally signed by Balubai Prakash Dhamankar
Date: 2026.05.06 12:36:14 IST
Location: Maharashtra-MH